N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** लोणी काळभोर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0223 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**29/05/2026 16:39

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिंनाक पासून):** 02/04/2026
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 02/04/2026
**Time From (वेळेपासून):** 16:21 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:31 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 29/05/2026 **Time (वेळ):** 15:22 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 019
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 29/05/2026 15:22 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
ईशान्य, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** अपर तहसील कार्यालय लोणी काळभोर,पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अंकुश रामदास लोखंडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जि अहिल्यानगर,लोणी काळभोर,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जि अहिल्यानगर,लोणी काळभोर,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9881873330

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अक्षय शिवाजी कोल्हे | | | 1. अपर तहसील कार्यालय लोणी काळभोर,पुणे,लोणी काळभोर, पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

प्रथम खबरी अहवाल   जबाब
दिंनाक  29/05/2026
मी सुहास गणेशराव हट्टेकर, वय- 37 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे मो नं 9881873330
मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 01/04/2026 रोजी 16.00 वा मी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री.दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी त्यांचे कार्यालयात बोलावून तक्रारदार श्री. अंकुश रामदास लोखंडे वय 38 वर्ष व्यवसाय रिअल इस्टेट रा बेलवंडी (बु) ता .श्रीगोंदा जि.अहील्यानगर यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले.व सदर कारवाई करीता सहा संचालक नगर रचना विभाग कार्यालय पुणे येथील पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगितले. आम्ही तक्रारदार यांना आमचे कक्षात घेवुन जावुन त्यांची तक्रार ऐकुन घेतली. व तक्रारदार यांनी त्यांची तक्रार हस्ताक्षरात देखील लिहून दिली. 18.00 वा पंच लाप्रवि कार्यालयात आमचे कक्षात आले. त्यांना त्यांची नावे विचारली असता त्यांनी त्यांची नावे 1) माधवी दत्तात्रय पवार वय 42 वर्ष  व्यवसाय - नोकरी, पद कनिष्ठ लिपीक सहा.संचालक कार्यालय नगर रचना पुणे शाखा पुणे.2) श्री रतन ज्ञानदेव कांबळे, वय 35 वर्षे,पद- वरिष्ठ लिपीक सहा.संचालक कार्यालय नगर रचनाकार विभाग पुणे असे सांगितले.त्यांची तक्रारदार अंकुश लोखंडे यांचेशी ओळख करून दिली. तक्रारदार यांनी त्याची तक्रार सांगितली व स्वतहस्ताक्षरात लिहलेली तक्रार देखील दाखविली. ती पुढीलप्रमाणे,
"मी वरील ठिकाणी राहणारा असुन मौजे हिंगणगाव अष्टापूर ता.हवेली जि.पुणे येथे सातबारा गट नंबर 101 मध्ये 44 आर जमीन आता खरेदीने घेतलेली आहे.(दिंनाक 18/12/2025 रोजी ) सदर ठिकाणी जमीन सपाटीकरण, पाईपलाईन,विहीर खोदणे असल्याने मी दिंनाक 23/03/2026 रोजी अप्पर तहसील कार्यालय लोणीकाळभोर यांना  अर्ज सादर केलेला आहे.
तेव्हापासुन मी वांरवार अप्पर तहसील कार्यालय लोणी काळभोर येथे जावुन गौणखनिज विभागात काम करणारे शासकीय कर्मचारी श्री कोल्हे साहेब यांना भेटून मला सपाटीकरण परवानगी,विहीर खोदकाम व पाईपलाईन मंजुरी मिळावी याकरिता वांरवार विंनती केली असता त्यांनी मला मॅडमशी बोलून सांगतो असे सांगितले.तसेच मी त्यांना त्याचा मो न 9021465117 यावर कॉल करून  विचारणा केली असता त्यांनी वेगवेगळी कारणे देत आहेत.
आज दिंनाक 01/04/2026 रोजी 11 ते 11.30 दरम्यान मी अपर तहसील कार्यालय लोणी काळभोर येथे जावुन श्री कोल्हे साहेब यांची समक्ष भेट घेतली असता व माझे परवानगीबाबत विचारणा केली असता त्यांनी मला सांगितले कि,या प्रकरणामध्ये ब-याच त्रुटी आहेत. हे पुर्ण करण्याकरिता तुम्हाला कामाकरिता 340000/रूपये चलन होवु शकते तुम्हाला हा खर्च वाचवायचा असेल तर मला (2,00,000/-) दोन लाख रूपये दया मी मॅडम ची सही घेउन तुम्हाला परवानगी मिळवून देतो.त्यावेळी मी त्यांना सांगितले कि माझे सर्व प्रकरण लिगल आहे परंतू तरी देखील कोल्हेसाहेब हे माझ्याकडे (200000/-) दोन लाख रूपये मागत होते.जर पैसे दिले नाही तर प्रकरण त्रुटीवर परत  पाठवितो .तुम्ही बसा चकरा मारत असी परवानगी मिळत नसते त्यासाठी पैसे खर्च करावे लागतात.
तरी श्री कोल्हे साहेब यांनी मला विहीर खोदकाम, पाईपलाईन व जमीन सपाटीकरण करण्याकरिता परवानगी मिळूवुन देण्याकरिता (2,00,000/-)दोन लाख रूपये लाचेची मागणी केली आहे.श्री कोल्हे यानी यांनी मागितलेली रक्कम ही कुठलीही शासकीय फी नसुन लाचेची मागणी असल्याची माझी खात्री आहे.कोल्हे व माझ्यामध्ये कुठलेही आर्थिक देवाणघेवाण नाही व कुठलेही वाद नाहीत.
तरी श्री कोल्हे गौणखनिज विभाग अपर तसहील कार्यालय लोणीकाळभोर यांनी मागितलेल्या लाच रकमेविषयी

लाचलुचपत प्रतिंबध विभागामाफत योग्य ती कार्यवाही होण्यास विंनती आहे.
तक्रारदार यांना श्री कोल्हे शासकीय कर्मचारी यांना लाच देण्याची ईच्छा नसलेने ते लाचलुचपत प्रतिंबधक कार्यालय येथे तक्रार देण्याकरिता आले असे सांगितले.पंच व आम्ही तक्रारदार यांनी दिलेली लेखी तक्रार वाचून त्यावर सहया केल्या.
पुढील कारवाई लगेच करण्याबाबत ठरविले.त्याप्रमाणे आम्ही सापळा पथक,पंच असे शासकीय वाहन क्रमांक एम एच 12 आर वय 7271 मध्ये व तक्रारदार, त्यांचे कोरेला कार मध्ये बसुन 18.15 वा रवाना होवुन कदम वाक वस्ती सोलापूर रेोड येथे मॅकडोनल्ड जवळ 19.20 वा पोहचलो असता तेथे तक्रारदार यांना लोकसेवक कार्यालयात नसलेबाबत माहीती प्राप्त झालेने पुढील कारवाई दिंनाक 02/04/2026 रोजी करण्याचे ठरले.सकाळी 11.00 वा चे सुमारास तक्रारदार यांना अनुश्री लॉन्स कुंजीरवाडी येथे हजर राहणेबाबत सुचना दिल्या व पंच व सापळा पथकास 09.45 वा लाप्रवि पुणे येथे हजर राहण्याबाबत सुचना देण्यात आल्या.
दिंनाक 02/04/2026 रोजी 10.00 चे दरम्यान पंच, आम्ही व सापळा पथक अंमलदार पोहवा तावरे, मपोशि 2652/कोमल शेटे, आणि चालक पोहवा/ दिपक दिवेकर शासकीय वाहन महींद्रा गाडी क्र. एमएच 12 आर वाय 7271 मध्ये पंचासह बसलो असता पंचाना सर्वाची ओळख करून दिली. सापळा साहीत्यासह सर्वजण गाडीत बसुन आम्ही लाप्रवि कार्यालय, पुणे येथुन साधुवासवानी चौक- हडपसर-अनुश्री लॉन्स कुंजीरवाडी येथे 11.10 वा पोहचलो.सदर ठिकाणी तक्रारदार अंकुश लोखंडे हे त्यांची कार क्रमांक एम एच 12 एम डब्लयू.0555 यामधुन आमचेजवळ येवुन थांबले. त्यांना सापळा पथकातील अंमलदार व पंचाची पुन्हा ओळख करून दिली.व सापळा कारवाईकरिता आणलेले लॅपटॉप, प्रिंटर, काळा कपडा, अॅन्थ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायोलेट टॉर्च, मेमरी कार्ड, व्हाईस रेकॉर्डर, व्हिडिओ रेकॉर्डर, स्टेशनरी साहित्य व इतर साहित्य सोबत आणल्याचे पंचासमक्ष तक्रारदार यांना दाखविले.
तक्रारदार यांना सरकारी वाहनात बसवुन यांचेकडे पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांची तक्रार कायम असलेबाबत सांगितले.त्यानंतर मी तक्रारदार व पंचास शासकीय व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली. एक नवीन सिंलबद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन त्याची पाहणी केली असता, त्यावर एका बाजुस sandisk ultra 32 GB microSD U1 HCL C10A1 व दुसरे बाजुस 5482XX1410JV BM MADE IN CHINA असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदरचे मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले आणि पंचांना व तक्रारदार श्री. अंकुश लोखंडे यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून मेमरीकार्डमध्ये यापुर्वी कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रित नसल्याची त्यांची व पंचाची खात्री करून दिली. तसेच निवेदन व सापळा कारवाईचे चित्रीकरण मपोशि शेटे यांचे सॅमसंग मोबाईलमध्ये करण्यात येणार असलेचे सांगुन मपोशि शेटे यांचा सॅमसंग ऐ 33 5 जी मोबाईल दाखविला व त्याकरिता वापरण्यात येणारे नवीन मेमरी कार्ड दाखविले त्यावर Lexarmicro HC V10633X A132GB व दुसरे बाजुस L112925 0032A2A82W2445111164M असे छापलेले असल्याचे दिसुन आले.सदर मेमरी कार्ड मोबाईलमध्ये बसविले.व त्यामध्ये पुर्वीचे कुठलेही चित्रीकरण नसल्यांची खात्री करून दिली. तक्रारदार व पंच यांचे डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये निवेदन घेण्यात आले. त्याचे व्हिडीओ रेकॉर्डिग केले. त्यानंतर यांचे तक्रारीचे अनुषंगाने लोकसेवक कोल्हे क्लार्क अपर तहसील कार्यालय लोणी काळभोर पुणे यांचे कार्यालयात लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याकरिता सुचना देवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सूरू करून तक्रारदार यांचे बनियनला आतील सेप्टी पीनच्या साहयाने लावून तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांना तक्रारदार यांचे कोरेला अल्टीस कार क्रमांक एम एच 12 एम डब्लयू.0555 मध्ुन लोकसेवकाचे कार्यालयात बोलणी करण्याकरिता रवाना केले तेव्हा 11:54 वाजले होते. ते परत आले तेव्हा 12:13 वाजले होते.तेव्हा पंच व तक्रारदार यांनी सांगितले कि लोकसेवक कामानिमीत्त बाहेर गेले व त्यांनी 4 ते 5 वाजता कॉल करून येण्याबात सांगितले. त्यानंतर 15:33 वा तक्रारदार यांनी पंचासमक्ष त्यांचे मोबाईलवरून लोकसेवक कोल्हे यांना 9021465117 यावर कॉल करून त्यांचेसोबत फोनवर बोलणे केले तेव्हा.लोकसेवक यांनी 15 ते 20 मिनीटानंतर कार्यालयात येण्याबाबत सांगितले. त्यांनतर तक्रारदार व पंच क्रमांक 01 यांना सुचना देवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांचे शर्टाचे आत बनियनला लावुन तक्रारदार यांचे गाडीतुन लोकसेवकाचे कार्यालयात बोलणी बोलणी करण्याकरिता पाठविले तेव्हा 16:21 वाजले होते. तक्रारदार व पंच क्रं 1 सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले तेव्हा त्यांचा रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला तेव्हा 17:31 वाजले होते. तेव्हा पंच क्र 02 यांचेसमक्ष रवाना केल्यापासून येईपर्यत काय झाले याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगितले कि, श्री कोल्हे यांना माझे काम झाले काय याबाबत विचारणा केली असता लोकसेवक कोल्हे यांनी “नाही मॅडम अजुन आल्याच नाहीत” असे सांगितले.त्यावेळी तक्रारदार यांनी पंच श्रीमती माधवी पवार हया बहीण असलेची ओळख करून दिली.व लोकसेवक कोल्हे यांना “तुमच काय म्हणणय” असे विचारले. तेव्हा कोल्हे यांनी सांगितले कि, “माझं काय नसतयं

तुम्ही एवढच सांगितल अन तेवढच करायच आपल्याला" त्यावेळी तक्रारदार यांनी कोल्हे यांना "तुम्ही सांगा ना साहेब.... अ... तुम्ही फायनली एखादा आकडा सांगा ना" असे विचारले असता लोकसेवक कोल्हे यांनी "तस मी त्यांना.... (असे म्हणुन लोकसेवक यांनी पंचासमक्ष उजवे हाताच्या तर्जनीचे एक बोट दाखवुन एक असा इशारा केला)" सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी कोल्हे यांना "एक" असे विचारले. तेव्हा कोल्हे यांनी "आकडयाचं मी तुम्हाला फायनल सांगत नाही.. आकडयाचं अस फायनल सांगत नाहीत तुम्ही असतानी एक पर्यंत आणतो किंवा 70 ..75 पर्यत आणतो ... चालु करायच्या वेळेला 50 पासुन सुरू करू" असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी कोल्हे यांना " 1 लाख का ?" असे विचारले असता कोल्हे यानी " हो ..... अं...?" असे सांगितले. तक्रारदार यांनी परत श्री कोल्हे यांना "एक लाख..." असे विचारले. तेव्हा कोल्हे यांनी " हो... हो "असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी कोल्हे यांना "जरा ज्यादा होतयं साहेब, सत्तरपर्यंत (70 )बघा ना," असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक कोल्हे यांनी "मी करताना त्यांना पन्नास पासुनच चालु करतो." असे सांगितले. तक्रारदार यांनी कोल्हे यांना मला एवढा वेळ कमी मध्ये मदत करा असे सांगितले असता कोल्हे यांनी सांगितले कि, "आपण फॅमिलीतले च यत सगळे... मी तसं सांगतो त्यांना चालू करताना 50 पासुनच चालू करतो.. चालु करताना त्यांना..... पन्नास देतोत असच म्हणतो.. पण बाबा ... मला अस वाटतं त्या एक पर्यंत डन होत्यान.." त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक कोल्हे यांना "एक लाख का" असे विचारले असता लोकसेवक कोल्हे यांनी, "ह" असे सांगितले.त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक कोल्हे यांना "एक लाख जरा ज्यादाच होतेनं... एक 75 पर्यंत बघा ना साहेब...अं...." असे विचारले असता लोकसेवक कोल्हे यांनी "बघू" असे सांगितले. तक्रारदार यांनी लोकसेवक कोल्हे यांना त्यांचे परवानगीचे अनुषंगाने विचारणा केली असता त्यांनी परवानगीचे अर्जात पंचनामामध्ये त्रुटी असुन सदर त्रुटींचा सोमवारी पंचनामा करून पुन्हा नोटीग ठेवुन मॅडमंची सही घेवुन देते ा असे सांगितले. तसेच पंचाबाबत वांरवार विचारणा केली. व तक्रारदार यांचे प्रकरणात काही त्रुटी नसल्यास काम असेच होईल असे सांगुन पुन्हा रकमेविषयी बोलण्यास टाळाटाळ केली. व सोमवारी कार्यालयात येण्याबाबत सांगितले.तसेच पंच क्रमांक 01 श्रीमती माधवी पवार यांनी देखील सांगितले कि,ते व तक्रारदार दोघेही सोबतच होते व त्यांच समक्ष तक्रारदार व लोकसेवक कोल्हे यांचे बोलणे झालेले आहे ते त्यांनी ऐकले व पाहीले आहे. असे सांगुन तक्रारदार यांचेप्रमाणे हकीगत सांगितली. व आम्ही देखील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले ते बरोबर असलेची खात्री झाली.तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दिंनाक 08/04/2026 रोजी तक्रारदार लाप्रवि कार्यालयात हजर झालेने लोकसेवक हे कार्यालयात हजर आहेत काय याबाबत खात्री करण्याकरिता लोकसेवक कोल्हे यांना पंचासमक्ष फोन करून पुढील पडताळणी कारवाई करण्याचे ठरले. त्याप्रमाणे पंचासमक्ष तक्रारदार यांचा मो.क्र.9028794017 यावरून लोकसेवक कोल्हे यांना त्यांचा मो क्र 9021465117 यावर 12:57 दुसरा कॉल केला व फोनचा स्पीकर ऑन केला असता लोकसेवक कोल्हे यांनी सदर कॉल उचलला असता लोकसेवक व तक्रारदार यांचे बोलणे झाले असता तक्रारदार लोखंडे यांनी लोकसेवक कोल्हे यांना "आपल फेरअहवालाच काम झाल का" असे विचारले असता लोकसेवक कोल्हे यांनी "हो झालय ते टपालात ठेवलय घेवुन जा" असे सांगितले. व पेमेंटबाबत बोलत असताना फोन कट केला.सदर कॉल डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आला आहे.

लोकसेवकाशी अर्धवट बोलणे झालेने व फोनवर बोलणे टाळले असलेने तक्रारदार यांना लोकसेवकाचे कार्यालयात बोलणी करण्याकरिता पाठविण्याबाबत ठरविले त्याप्रमाणे सर्वजण मांजरी परिसरात गेलो. तेथुन तक्रारदार व पंच यांना 14:40 वा लोकसेवक कोल्हे यांचे अपर तहसील कार्यालय लोणीकाळभोर पुणे येथे रवाना केले. ते 15:08 वा परत आले व सांगितले कि, लोकसेवक हे कार्यालयात नाहीत ते जिल्हाधिकारी कार्यालयात गेलेची माहीती मिळाली. त्यांना तक्रारदार यांनी मोबाईलवर कॉल केले परंतु लोकसेवक कोल्हे यांनी कॉल उचलले नाहीत.म्हणुन पुढील कारवाई 09/04/2026 रोजी करण्याचे ठरविले. झाले कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तक्रारदार यांनी कळविले कि, दिंनाक 08/04/2026 रोजी ते घरी गेल्यानंतर रात्री त्यांना तलाठी श्री. वडघुले हिंगणगाव यांचा कॉल आला होता. त्यांनी सांगितले कि तक्रारदार यांनी तहसील कार्यालय लोणी काळभोर येथे दिलेल्या अर्जाचे अनुषंगाने परवानगी आलेली आहे. तसेच तक्रारदार यांचा हिंगणगाव येथिल मित्र रमेश वेताळ यांनी दिंनाक 09/04/2026 रोजी फोन करून सांगितले कि, तक्रारदार यांची तहसील कार्यालयात केलेल्या अर्जाची परवानगीचे पत्र त्यांना व्हाटसअपदवारे प्राप्त झाले आहे. व त्यांनी तक्रारदार यांना व्हाटसअपदवारे पाठविले आहे. त्यावर प्रति मध्ये तक्रारदार यांचे नाव असुन सदर एनओसी वर जा.क्र.गौण/कावि/196/2026 दिंनाकक 01/04/2026 अशी आउटवर्ड केलेची तारीख दिसली.

तरी सदरबाबतची खात्री करण्याकरिता दिंनाक 09/04/2026 रोजी तक्रारदार व पंच क्रमांक 01 यांना लोकसेवक कोल्हे यांचे कार्यालयात पाठवुन समक्ष बोलणी करण्याबाबत ठरविण्यात आले. त्याप्रमाणे सर्व सापळा

पथक व तक्रारदार असे सर्वजण टोयोटा शोरूम लोणीकाळभोर परिसरात जावुन सरकारी वाहनातच तक्रारदार व पंच यांचे वक्तव्य घेवुन तक्रारदार व पंच क्रमांक 01 माधवी पवार यांना सुचना देवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार शर्टचे आतील बनियनला लावून लोकसेवकाची भेट घेवुन बोलणी करण्याकरिता तक्रारदार यांचे कारमधुन लोकसेवकाचे अपर तहसील कार्यालय लोणीकाळभोर येथे 17:18 वा रवाना केले.ते 17:23 वा परत आले. तेव्हा त्यांनी सांगितले कि, तक्रारदार पंच क्रमांक 1 असे लोकसेवकाचे कार्यालयात गेले असता लोकसेवक तेथे मिळुन आले नाही. तक्रारदार यांनी त्यांना वारवांर कॉल केले परंतु त्यांनी कॉल उचलले नाही. तसेच पंच क्रमांक 01 यांनी देखील तसेच तशीच हकीगत सांगितली. त्यानंतर सदर कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. तसेच कारवाईदरम्यान वापरण्यात आलेले मेमरीकार्डची हॅश व्हॅल्यू घेण्यात आली असुन ते सीलबंद करण्यात आले आहेत. तरी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागामाफत करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान दि.02/04/2026 रोजी 16:21 वा ते 17:31 वाजेचे दरम्यान अपर तहसील कार्यालय लोणी काळभोर येथे तक्रारदार श्री. अंकुश रामदास लोखंडे यांचे जमिन सपाटीकरण, विहीर व पाईपलाईन चे कामाची परवानगी देण्याकरीता तहसीलदार मॅडम तहसील कार्यालय लोणी काळभोर यांची सही घेवुन देण्याकरीता तहसीलदार मॅडम यांचे नावे लोकसेवक अक्षय शिवाजी कोल्हे वय २८ वर्षे पद ग्राम महसुल अधिकारी नेमणुक अपर तहसील कार्यालय लोणी काळभोर यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती 1,00,000/- रुपये (एक लाख रूपये ) लाचेची मागणी केली. लोकसेवक अक्षय कोल्हे क्लार्क अपर तहसील कार्यालय लोणी काळभोर पुणे यांनी तक्रारदार यांना परवानगी देण्याकरिता यांचेकडून गैरकायदेशीर पारितोषण मागणी केली आहे. म्हणुन माझी त्याचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर तक्रार आहे. माझा वरील फिंयादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलीखीत करण्यात आलेला असुन तो मी वाचुन पाहीला असुन बरोबर आहे.

समक्ष हा फिंयादी जबाब दिला.........

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** **(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

rajendra bausaheb panhale(I (Inspector)) / pcmab82767 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव)**:**

**Rank** (पद)**:** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**:**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची सवाक्षरी)

**Name** (नाव): rajendra bausaheb p

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): pcmah82767

ठाणे अंमलदार
... पोलीस स्टेशन

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):